Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ५०]   गुरुवार ते बुधवार, डिसेंबर ११-१७, २०२५/अग्रहायण २०-२६, शके १९४७   [पृष्ठे ८, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	नाही.
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-८
भाग एक-अ.—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	नाही.

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८१.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा सदस्य सचिव, यांजकडून

वाचा :– (१) शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र.-संकीर्ण-०३-२०१५-प्र. क्र. ३४-अ-२ , दिनांक १२ मे, २०१५.

(२) शासन निर्णय, महसूल व वनविभाग क्र.-संकीर्ण-०३-२०१५-प्र. क्र. ३४-अ-२ , दिनांक ३० सप्टेंबर, २०१५.

(३) म. शा., महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र. क्र. १२-भाग-अ-२- मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ जानेवारी, २०१७.

खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत

जाहीर नोटीस

क्रमांक मं. अ.-उपजिभूसं/लसिंकामे/कावि-३८७/२०२५.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१, अमरावती यांनी निम्न पेढी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. ०३-२०१५-प्र. अ. ३४-अ-२, दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ मधील तरतुदीस अनुसरुन

खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने घेण्याबाबत त्यांचे कार्यालयीन पत्र जा. क्र. १२६७-रेशा-सरळ खरेदी भूसंपादन-२०२५, दिनांक १९ मार्च, २०२५ नुसार सरळ खरेदी प्रस्ताव ०१-४७-२०२४-२०२५ मौजा सावरखेड (गावठाण), ता. भातकुली, जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ ३५२०० चौ. फु. चा सरळ खरेदीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ. का.- प्र. अ.- भूसंपादन-कावि-१५२-२०२५, दिनांक २५ मार्च, २०२५ अन्वये, उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२ मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वनविभाग क्रमांक एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र. १२-अ-२, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता.—

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ल. सिं.कामे, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे,

अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र.१, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि;

अनुसूची (दोन)

निम्न पेढी प्रकल्पाचे बुडित क्षेत्राचे प्रयोजनाकरीता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने संपादित करताना जिल्हास्तरीय समिती मार्फत भूमि संपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या शेडयुल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र. १, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र. १, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र. १, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखडयाची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग क्र. १, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

अनुसूची (चार)

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक ०९-४७-२०२४- २०२५, मौजा सावरखेड (गावठाण), ता. भातकुली, जि. अमरावती येथे निम्न पेढी प्रकल्पाचे बुडित क्षेत्राचे प्रयोजनाकरीता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील/ संयुक्त मोजणीप्रमाण—

अ. क्र	भूधारकांचे नांव	मालमत्ता क्र.	गाव नमुना ८ प्रमाणे एकूण क्षेत्र	संयुक्त मोजणी प्रमाणे संपादित करावयाचे क्षेत्र		
				एकूण क्षेत्र	बांधकाम क्षेत्र	खुले क्षेत्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
			चौ.मी.	चौ.मी.	चौ.मी.	चौ.मी.
१	कमलाबाई विश्वनाथ तंतरपाळे	६४	१११.५२	१११.५२	६६.३५	४५.१७
२	बाबूराव सहदेव तायडे	४५	१०७.८९	१०७.८९	६०.५१	४७.३८
३	बंडू सहदेव तायडे	१७४	५०.१८	५०.१८	५०.१८	०

अनुसूची - (चार)-चालू

(१)	(२)	(३)	(४) चौ.मी.	(५) चौ.मी.	(६) चौ.मी.	(७) चौ.मी.
४	एकनाथ काशिनाथ खोरगडे	८५	३६.२३	३६.२३	३६.२३	०
५	भाऊराव सोनाजी तायडे (मय्यत) वारस-मालता भाऊराव तायडे	५१/१	३३.४४	३३.४४	२३.२५	१०.१९
६	दिपक धोंडूजी खोरगडे व इतर ४	८७	१७८.६२	१७८.६२	१६९.८३	८.७९
७	रामदास काशिनाथ पारिसे	१८५	३१.२१	३१.२१	२५.९९	५.२२
८	देविदास उत्तमराव टिपरे	१६/२	४६.८४	४६.८४	४६.८४	०
९	रमाबाई अरुण तायडे	३९	३९.८६	३९.८६	३९.८६	०
१०	साहेबराव नारायण अढाऊ (मय्यत) वारस-दिपक साहेबराव अढाऊ	७७	१२७.५०	१२७.५०	११३.०२	१४.४८
११	दादाराव सोनाजी तायडे	५१	४४.६०	४४.६०	२४.४४	२०.१६
१२	भावीकदास लक्ष्मण तायडे (मय्यत) वारस-राजकुमार भावीकदास तायडे	४९	७८.०६	७८.०६	२६.८१	५१.२५
१३	गौतम माकोडाजी तायडे (मय्यत) वारस वंदना गौतम तायडे व इतर ३	५०	३७.१७	३७.१७	२०.२२	१६.९५
१४	राहुल विश्वनाथ तायडे	४३/१	४६.४५	४६.४५	२८.४५	१८.००
१५	शैलेश उध्दवराव तायडे	५४/१	२८.२४	२८.२४	१०.००	१८.२४
१६	विनोद भिमरावजी खेडकर	७९	६३.७५	६३.७५	६३.७५	०
१७	जनार्धन नामदेव तायडे	५६	१८.१२	१८.१२	१६.६२	१.५०
		एकूण . .	१०७९.६८	१०७९.६८	८२२.३५	२५७.३३

अमरावती :
दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५.

(अवाच्य),
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
लघु सिंचन कामे, अमरावती तथा
सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती, अमरावती.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२८.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम-१९ ची अधिसूचना

क्रमाक उविअ-भूसंपादन-कावि-५९१-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या अकोला जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात पुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसूचना क्रमांक भाग १, (अ.वि.पु.) म.शा.रा., अ.क्र. ७८५, दिनांक २६ डिसेंबर, २०२४ ते ०१ जानेवारी, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विर्निदिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, अकोला जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादन करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे,;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदी अन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये या प्रकल्पांमुळे कोणतेही गाव बाधित होत नाही असे नमूद केले आहे व पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये सामाजिक प्रभाव निर्धारण सारांशमध्ये **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक भाग-४-अ, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यांचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे नमूद करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूची-तीनमध्ये पुनर्वसाहत क्षेत्राचे व अनुसूची-चारमध्ये पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश निरंक आहे.

आणि म्हणून, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन हे जिल्हाधिकारी आहे.

अनुसूची एक
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक एलएक्यु-४७- कपिलेश्वर- १३-२०२३-२४,
गांव-कपिलेश्वर, तहसील अकोला, जिल्हा-अकोला.

अ. क्र.	भूमापन किंवा गट नं./ स. नं.	भूधारणा पध्दती	७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र	संपादित करावयाचे क्षेत्र	गाव नमुना ७/१२ नुसार भूधारकांचे नांव
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			हे. आर	हे. आर	
१	२०४	वर्ग-१	१.१६	०.०३	माणिकराव मोतीराम आठवले
२	२०५/१	वर्ग-१	१.७५	०.१३	अतुल रामभाऊ खराटे
३	२०५/२	वर्ग-१	१.७५	०.१३	गोपाल रामेश्वर खराटे
					गजानन पांडुरंग खराटे
४	२०६	वर्ग-१	१.९३	०.१९	विलास पांडुरंग खराटे
					हरिभाऊ पांडुरंग खराटे
					गजानन पांडुरंग खराटे
५	२०७	वर्ग-१	०.८१	०.३२	विलास पांडुरंग खराटे
					हरिभाऊ पांडुरंग खराटे व इतर
				०.१५	गजानन जानुजी इंगळे
					शशीकला गजानन इंगळे
६	२०८	वर्ग-१	२.०८	०.०७	ताईबाई महादेव चव्हाण,
					बाली संतोष इंगोले, देवानंद महादेव चव्हाण,
					शिला बाबन खंडारे
७	२०९	वर्ग-१	०.६९	०.२२	ताईबाई महादेव चव्हाण
					बाली संतोष इंगोले,देवानंद महादेव चव्हाण,

अनुसूची - एक-चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			हे. आर	हे. आर	
					शिला बाबन खंडारे
८	२१०/१	वर्ग-१	२.०१	०.५४	चित्रा सुभाष खराटे
९	२१४	वर्ग-१	३.९७	०.१०	गजानन पांडुरंग खराटे विलास पांडुरंग खराटे
					हरिभाऊ पाडुरंग खराटे
१०	२१५	वर्ग-१	२.१७	०.०३	पद्मा मुरलिधर ताथोड
११	२१७	वर्ग-१	१.६७	०.५४	विलास विठ्ठलराव टिकार
१२	२१८	वर्ग-१	१.६८	०.२५	अशोक धोंडुजी मुकींद
					सुरेखा ज्ञानेश्वर मुकिंद व इतर
१३	२१९	वर्ग-१	१.६७	०.६६	कस्तुराबाई ज. पांडुरंग कराळे
					रमेश तुळशीराम बोदडे
					यशोदाबाई सहदेव नवलकार
१४	२२१	वर्ग-१	१.४९	०.०८	कपिलमुनी संस्थान, कपिलेश्वर
१५	२२२	वर्ग-१	२.६३	०.१५	उज्वलसिंग भिमसिंग सूर्यवंशी व इतर
१६	२२९	वर्ग-१	०.४०	०.०२	रामेश्वर सुखदेव आठवले
१७	२३०	वर्ग-१	१.६६	०.०४	महादेवसिंग रामसिंग सूर्यवंशी
			एकूण ..	३.६५	

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- काटीपाटी (सं) बॅरेज लघुपाटबंधारे प्रकल्प अंर्तगत भूसंपादन प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- काटीपाटी (संग्राहक) बॅरेज प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राच्या कामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र अकोला जिल्ह्यातील अकोला व अकोट तालुक्यातील काटी, पाटी, किनखेड, केळीवेळी, रोहणा व वडद या सहा गावातील असे एकूण १८०० हे. आर. आहे. यामुळे सिंचनक्षेत्रामध्ये वाढ होईल व रोजगारातही वाढ होणे अपेक्षित आहे.

अनुसूची-तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापन होत नसल्यामुळे माहिती -निरंक-

अनुसूची-चार

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४ (अ), दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे माहिती -निरंक-

अकोला :
दिनांक २६ नोव्हेंबर, २०२५.

डॉ. शरद ज्ञानेश्वर जावळे,
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, अकोला.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८३.

जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, यांजकडून

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. आस्थापना-१०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्ही.सी.आर.-४३२४-स-४-९४, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उपअधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर यांचेकडील पत्र क्रमांक-न.भू.-ड्रोन सर्वे-परिरक्षण प्रस्ताव-मौजा सनगाव व धानोरा खु., दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ प्राप्त दि. २९ सप्टेंबर, २०२५.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश -३२२४-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही.सी. आर- ४३२४–स ४-९४,-पुणे, दिनांक २३ सप्टेंबर,१९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र. ३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे सजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारित करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये सजा परिरक्षण भूमापक मंगरूळपीर यामध्ये मौजा सनगाव व धानोरा खु. हे ०२ गावे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर या कार्यालयाच्या अधिनस्त सजा नगर परिरक्षण भूमापक १, मंगरूळपीर यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहेत. तसेच त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ.क्र.	गावाचे नाव	वसुल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	सनगाव (५३०८२५)	१४४८८५ /- (अक्षरी रक्कम एक लक्ष चौरेचाळीस हजार आठशे पंच्याशी रुपये)
२	धानोरा खु (५३०८१६)	५९७०५/- (अक्षरी रक्कम ऐकोणसाठ हजार सातशे पाच रुपये)

दिनांक १ ऑक्टोबर, २०२५.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८४.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. आस्थापना-१०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्ही.सी.आर.-४३२४-स-४-९४, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उपअधीक्षक, भूमि अभिलेख, कारंजा यांचेकडील पत्र क्रमांक- न.भू.-महास्वामित्व-परिरक्षण प्रस्ताव-मौजा पिंपरी मोडक, पिंपरी मोखाड, वडगाव रंगे, वढवी दि.१३ ऑक्टोबर, २०२५ प्राप्त दि १६ ऑक्टोबर, २०२५, E-३७४६५१५.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश ३३१५-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१-दिनांक, १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही.सी. आर-४३२४-स-४-९४ पुणे, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे सजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारीत करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कारंजा यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये सजा परिरक्षण भूमापक कारंजा यामध्ये मौजा पिंपरी मोडक, पिंपरी मोखाड, वडगाव रंगे, वढवी हे ०४ गावे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कारंजा या कार्यालयाच्या अधिनस्त सजा नगर परिरक्षण भूमापक-१, कारंजा यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहेत. तसेच त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अमंलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ.क्र.	गावाचे नाव	वसूल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	पिंपरी मोडक (५३०९२२)	१६८३९० /- (अक्षरी रक्कम एक लक्ष अडूसष्ट हजार तीनशे नव्वद रुपये)
२	पिंपरी मोखाड (५३०८६८)	५४७९५ /- (अक्षरी रक्कम चौपन्न हजार सातशे पंच्यान्नव रुपये)
३	वडगाव रंगे (५३०९३८)	१३६५३०/- (अक्षरी रक्कम एक लक्ष छत्तीस हजार पाचशे तीस रुपये)
४	वढवी (५३०९६६)	१३७२५५/- (अक्षरी रक्कम एक लक्ष सदोतीस हजार दोनशे पंचावन रुपये)

दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३८५.

वाचा : (१) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. आस्थापना-१०९३-प्र.क्र.१९-ल-५, दिनांक १८ ऑगस्ट, १९९४.

(२) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८-प्र.क्र.१३-मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९.

(३) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. एस.व्ही.सी.आर.-४३२४-स-४-९४, दिनांक २३ सप्टेंबर, १९९४.

(४) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.नागरी भूमापन-३-सनद फी आकारणी-प्र.क्र.१३८-२०, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२०.

(५) मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१.

(६) उपअधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरुळपीर यांचेकडील पत्र क्रमांक-न.भू.-महास्वामित्व-परिरक्षण प्रस्ताव-मौजा इचोरी, उमरी बु., झाडगाव, सार्सी, बोरव्हा बु., दि.१० नोव्हेंबर, २०२५, प्राप्त दि १० नोव्हेंबर, २०२५, E-३७७८९६८.

अधिसूचना

क्रमांक-गावठाण अधिसूचना-परिरक्षण आदेश ३३६२-२०२५.—

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक-आस्थापना १०९३-प्र.क्र.१९-ल-१-दिनांक १८ ऑगस्ट, १९९४ अन्वये भूमि अभिलेख विभागाची तालुका स्तरावर पुनर्रचना करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे या कार्यालयाकडील अधिसूचना क्र. एस. व्ही. सी. आर-४३२४-स-४-९४, पुणे दिनांक २३ सप्टेंबर, १९९४ अन्वये अमरावती विभागातील सजांची पुनर्रचना करणेत आली असून सजांची गावे व मिळकती कायम करणेत आल्या आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८-प्र.क्र.१३- मातंक, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांचेकडील क्र. गावठाण ड्रोन सर्व्हे-प्र.क्र.३९-२०२१, दिनांक २५ जानेवारी, २०२१ अन्वये प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकानुसार जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून ड्रोनव्दारे गावठाण भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे सजाकडे परिरक्षणास देणेबाबतचे आदेश पारीत करणेचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार, उप अधीक्षक भूमि अभिलेख, मंगरूळपीर यांचेकडील वाचा क्र. (६) नुसार प्राप्त प्रस्तावामध्ये सजा परिरक्षण भूमापक, मंगरूळपीर यामध्ये मौजा इचोरी, उमरी बु, झाडगाव, सार्सी, बोरव्हा बु. हे ०५ गावे नव्याने समाविष्ट करणे बाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मंगरूळपीर या कार्यालयाच्या अधिनस्त सजा नगर परिरक्षण भूमापक १, मंगरूळपीर यामध्ये वरील गावे नव्याने समाविष्ट करणेत येत आहेत. तसेच त्यांचे कार्यक्षेत्रात बदल करणेत येवून परिरक्षणास घेणेस मंजुरी देणेत येत आहे.

सदर अधिसूचनेची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे. तसेच वाचा क्र. (४) मध्ये नमूद केलेनुसार या गावांची सनद फी खालील तक्त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे नियमानुसार वसूल करावी.

तक्ता

अ.क्र.	गावाचे नाव	वसुल करावयाची सनद फी
(१)	(२)	(३)
१	इचोरी (५३०८२८)	६१०३५/- (अक्षरी रक्कम एकसष्ट हजार पस्तीस रुपये)
२	उमरी बु (५३०७९४)	२१३९०/- (अक्षरी रक्कम एकवीस हजार तीनशे नव्वद रुपये)
३	झाडगाव (५३०७६७)	४८२१५/- (अक्षरी रक्कम अठेचाळीस हजार दोनशे पंधरा रुपये)
४	सार्सी (५३०८३०)	१०७७२५/- (अक्षरी रक्कम एक लक्ष सात हजार सातशे पंचवीस रुपये)
५	बोरव्हा बु (५३०७५३)	२५०४०/- (अक्षरी रक्कम पंचवीस हजार चाळीस रुपये)

वाशिम :
दिनांक १९ नोव्हेंबर, २०२५.

शिल्पा सानप,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख,
वाशिम.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.